आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१४ ऑगस्ट २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू देशवासियांना संबोधित करणार

- देशाच्या फाळणी दरम्यान बलिदान दिलेल्यांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून स्मरण

- स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने पोलीस, अग्निशमन, होमगार्ड, नागरी सुरक्षा आणि सुधारणा सेवेतल्या कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकं जाहीर

**आणि**

- महिला कुस्तीपटू विनेश फोगाट अपात्रता प्रकरणाचा निकाल पुढे ढकलण्याचा क्रीडा न्याय प्राधिकरणाचा निर्णय

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला देशवासियांना संबोधित करणार आहेत. आकाशवाणीच्या देशभरातल्या सर्व केंद्रांवरुन तसंच दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवरून संध्याकाळी ७ वाजता हे भाषण आधी हिंदी आणि त्यानंतर इंग्रजी भाषेत प्रसारित केलं जाईल. त्यानंतर दूरदर्शनच्या प्रादेशिक वाहिन्यांवरून प्रादेशिक भाषांमध्ये राष्ट्रपतींचं भाषण प्रसारित होईल. आज रात्री साडे नऊ वाजता हे संबोधन आकाशवाणीवरुन प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित केलं जाईल. संध्याकाळी सात वाजता राष्ट्रपतींचं संबोधन प्रसारित होणार असल्यानं आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र आज संध्याकाळी पावणे सात वाजता प्रसारित होईल.

**<><><><><>**

७८वा स्वातंत्र्य दिन उद्या देशभरात साजरा होणार असून दिल्लीतल्या लाल किल्ल्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ध्वजारोहण करतील. त्यानंतर ऐतिहासिक तटबंदीवरून ते देशाला संबोधित करतील. यंदाच्या स्वातंत्र्य दिन सोहळ्याची संकल्पना विकसित भारत अशी आहे. स्वातंत्र्य दिन सोहळ्यात सहभागी होण्यासाठी केंद्र सरकारनं देशभरातल्या विशेष पाहुण्यांना आमंत्रित केलं आहे. यामध्ये महाराष्ट्रातल्या १२३ हून अधिक व्यक्तिंचा समावेश आहे. यात विशेष आमंत्रितांसह महिला, युवक, शेतकरी, आदिवासी, क्षेत्रीय अधिकारी आणि विविध सरकारी योजनांचे लाभार्थी, MyGov स्वातंत्र्य दिन प्रश्नमंजुषेचे विजेते आणि नीति आयोगाच्या विशेष आमंत्रितांसह समाजातल्या विविध घटकांचा समावेश असेल.

**<><><><><>**

देशाच्या फाळणीचं स्मरण आज देशभरात केलं जात आहे. यानिमित्त फाळणीमुळे दुःख भोगलेल्या असंख्य लोकांचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्मरण केलं. त्या सर्व लोकांच्या धैर्याला अभिवादन करण्याचा आजचा दिवस असल्याचं प्रधानमंत्र्यांनी आपल्या समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे. फाळणीमुळे ज्यांच्या आयुष्यावर परिणाम झाला होता त्यांनी नव्या दमानं आपलं आयुष्य उभं केलं असे गौरवोद्गार प्रधानमंत्र्यांनी काढले. देशाची एकता आणि बंधुत्वाची भावना सदैव जपण्याचा त्यांनी पुनरुच्चार केला. देशाच्या फाळणीवेळी विस्थापित झालेल्या आणि बलिदान दिलेल्यांना आदरांजली वाहण्यासाठी सरकारनं २०२१ मध्ये १४ ऑगस्ट हा  फाळणी स्मरण दिवस म्हणून जाहीर केला होता.

**<><><><><>**

हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा अभियाना अंतर्गत अरुणाचल प्रदेशात सहा हजार फूट तिरंगा ध्वज घेऊन निघालेल्या रॅलीचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी

कौतुक केलं. अरुणाचल प्रदेश ही देशभक्तीची भूमी असून राज्याच्या सांस्कृतिक वारशात ते स्पष्टपणे प्रतिबिंबित होतं. असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे. घरोघरी तिरंगा अभियानासाठी जनतेचा उत्साह पाहून आपल्याला आनंद होत असल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

"हर घर तिरंगा" मोहिमेचा भाग म्हणून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज त्याच्या नवी दिल्लीतल्या निवासस्थानावर राष्ट्रध्वज फडकवला. कोट्यवधी भारतीयांमधली एकता,एकनिष्ठता आणि अभिमान याचं प्रतीक म्हणजेच तिरंगा, असं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या नोंदीमध्ये म्हटलं आहे. घरावर तिरंगा फडकवताना देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या देशनायकांचं स्मरण होत असल्याचंही त्यांनी लिहिलं आहे.

**<><><><><>**

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने पोलीस, अग्निशमन, होमगार्ड, नागरी सुरक्षा आणि सुधारणा सेवेतल्या एकंदर १ हजार ३७ कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकांची घोषणा करण्यात आली आहे. तेलंगण पोलीस दलाचे मुख्य कॉन्स्टेबल चडूवू यादय्या यांना राष्ट्रपती शौर्यपदक जाहीर झालं आहे. २१३ कर्मचाऱ्यांना शौर्यपदक, तर ९४ जणांना विशेष सेवेसाठी राष्ट्रपती पदकानं सन्मानित करण्यात येत आहे. यापैकी ७५ कर्मचारी पोलीस सेवेतले, ८ अग्निशमन सेवेतले, ८ नागरी सुरक्षा आणि होम गार्ड सेवेतले, तर ३ सुधारणा सेवेतले कर्मचारी आहेत. ७२९ जणांना प्रशंसनीय सेवेसाठी पदकं जाहीर झाली आहेत. यात महाराष्ट्रातल्या विविध सेवांमध्ये कार्यरत असलेल्या ५९ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. भारतीय पोलीस सेवेचे अधिकारी, अतिरिक्त पोलीस महानिरीक्षक अनुज तारे यांना शौर्यपदक जाहीर झालं आहे. तर अतिरिक्त महासंचालक चिरंजीव प्रसाद, संचालक राजेंद्र डहाळे

आणि सहायक पोलीस आयुक्त सतीश गोवेकर यांना परमसेवा पदकानं सन्मानित करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.घरोघरी तिरंगा अभियानाविषयी ज्येष्ठ **अभिनेते सचिन पिळगावकर** म्हणाले...

**होल्ड--बाईट - सचिन पिळगावकर**

**<><><><><>**

कोलकाता इथल्या महिला डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणाचा तपास सीबीआय कडं सोपवण्याचे आदेश काल उच्च न्यायालयाने दिल्यानंतर निवासी डॉक्टरांच्या राष्ट्रीय संघटना फोर्डा ने देशव्यापी संप मागे घेतला आहे. केंद्रीय मंत्री जे.पी.नड्डा यांच्याशी झालेल्या भेटीनंतर हा संप मागे घेण्यात आला. दरम्यान, सीबीआयच्या पथकानं ताली पोलीस स्थानकातून एफआयआरची प्रत ताब्यात घेतली असून चार डॉक्टरांची चौकशीही केली आहे.

मुंबईत मार्डने पुकारलेला संप आजही सुरूच असून मुंबईतल्या केईएम, सायन आणि नायर सारख्या रुग्णालयात डॉक्टर कामावर नाहीत. आपत्कालीन सेवा मात्र सुरुच ठेवल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलियानं सर्व प्रकारच्या दहशतवादाचा तीव्र शब्दात निषेध केला आहे आणि दहशतवादाचा सामना करण्यासाठी सर्वसमावेशक आणि शाश्वत

धोरण आखण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य बळकट करण्याची गरज अधोरेखित केली आहे. नवी दिल्ली इथं काल पार पडलेल्या भारत-ऑस्ट्रेलिया दहशतवादविरोधी संयुक्त कृती गटाच्या १४ व्या बैठकीनंतर हे निवेदन जारी करण्यात आलं आहे. स्थानिक, प्रादेशिक आणि जागतिक पातळीवर दहशतवादाच्या धोक्याविषयी यावेळी चर्चा झाल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिली आहे. नव्या आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा दहशतवादासाठी होणारा दुरुपयोग, इंटरनेटच्या माध्यमातून दहशतवादासाठी पैसा गोळा करणं, कट्टरतावाद पसरवणं, संघटित गुन्हे आणि दहशतवाद यांच्यातले थेट संबंध याकडेही या बैठकीत लक्ष वेधलं गेलं.

**<><><><><>**

दिल्ली अबकारी धोरण घोटाळा प्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा अंतरिम जामीन सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळून लावला. यावर केंद्रीय अन्वेषण विभागानं उत्तर देण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं दिले आणि प्रकरणाची सुनावणी २३ ऑगस्टपर्यंत पुढे ढकलली.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधल्या सुरक्षा स्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोग आणि केंद्रीय गृह सचिव अजय भल्ला यांच्यात बैठक होणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक आयोगाने आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जम्मू काश्मीरला नुकतीच भेट दिली.

**<><><><><>**

ट्राय अर्थात दूरसंचार नियंत्रण मंडळाने नोंदणीकृत नसलेल्या क्रमांकावरुन प्रचारासाठी करण्यात येणारे फोन थांबवण्याचे आदेश सर्व सेवा पुरवठादार कंपन्यांना दिले आहेत. अनावश्यक फोन टाळण्यासाठी दूरसंचार मंत्रालयानं हे निर्बंध लावले आहेत. नोंदणीकृत क्रमांकाशिवाय कोणत्याही क्रमांकावरून असे फोन

येत असल्याचं आढळल्यास फोन करणाऱ्या कंपनीला दोन वर्षांसाठी काळ्या यादीत टाकलं जाणार असून या काळात त्यांना इतर कोणत्याही मोबाईल सेवा पुरवणाऱ्या कंपनीकडूनही नंबर मिळवता येणार नाही.

**<><><><><>**

महिला कुस्तीपटू विनेश फोगाट अपात्रता प्रकरणाचा निकाल क्रीडा न्याय प्राधिकरणानं पुन्हा पुढे ढकलला आहे. आता हा निकाल १६ ऑगस्ट रोजी जाहीर होण्याची शक्यता असल्याचं भारतीय ऑलिम्पिक संघटनेनं म्हटलं आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये ५० किलो वजनी गटात क्युबाची कुस्तीपटू युसनेलिस गुझमान लोपेझ हिच्यासोबत संयुक्त रौप्यपदक आपल्याला देण्यात यावं, अशी मागणी विनेशनं क्रीडा प्राधिकरणाकडे केली होती. सुवर्णपदकाच्या सामन्याच्या दिवशी तिचं वजन १०० ग्रॅम अधिक भरल्यानं तिला स्पर्धेतून अपात्र ठरवण्यात आलं होतं.

**//<><><><><>//**